# MARATHI PRELIM: SOLUTION PAPER 1

**विभाग १ - गदय**

**प्र.१ (अ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1 **A1)** कारणे लिहा. 2

वाघीण नाल्याजवळ दिसण्याची शक्यता होती; पण सावधगिरी बाळगणे आवश्यक होते, कारण ...

**Ans.** वाघिणीला पिल्ले होती. ती पिल्लांबरोबर वावरत होती. तिचे निरीक्षण करताना वाळलेल्या पाचोळ्यावर चालताना आवाज होतो. त्या आवाजाने वाघीण आपल्या पिल्लांना वाचविण्यासाठी आक्रमक होऊ शकते. म्हणून सावधगिरी बाळगणे आवश्यक असते.

> बिबळ्याच्या निरीक्षणांची चांगली संधी हातची गेली म्हणून मी हळहळलो. टोंगे यांना शरमिंद झाल्यासारखं वाटलं. आम्ही लगेच पुढं निघालो. थोड्याच अंतरावर रायबाकडं जाणारा रस्ता उजवीकडं वळत होता. तो रस्ता धरला आणि जंगल आणखीच दाट झाल्यासारखं वाटलं. इथं दोन-तीन नाले असल्यानं झुडपांची दाटी जास्तच जाणवते. तसंच त्या नाल्यांमध्ये थोडं पाणी साचून राहात असल्यानं तिथं कुठलाही वन्यप्राणी दिसण्याची शक्यता होती. त्यामुळं आता सावधपणे पावलं टाकणं आवश्यक होतं.
>
> कालच संध्याकाळी विश्रामगृहावर गप्पा मारताना टोंगेंनी मला त्या परिसरात चार पिल्लं असलेल्या वाघिणीबद्दल सांगितलं होतं. तेव्हा पासूनच मला कधी तिथं जातो असं झालं होतं. प्रचंड उष्णतेचे दिवस असल्यानं वाघासारखं जनावर पाण्याच्या आसपासच वावरतं. तशातच लहान पिल्लं असल्यानं या वाघिणीला त्यांना पाण्यापासून जास्त दूर नेणंदेखील शक्य नव्हतं; पण लहान पिल्लं असणारी वाघीण ही जंगलातलं सगळ्यात धोकादायक जनावर! पिल्लांच्या संरक्षणासाठी ही सजग आई, कुणाचा जीवदेखील घ्यायला मागं-पुढं बघत नाही. त्यामुळं सुकलेल्या नाल्यात उतरताना माझ्या मनावर एक अनामिक दडपण आलं होतं.

**A2)** कोण ते लिहा. 2

1) जंगलातलं सगळ्यात धोकादायक जनावर -

**Ans.** जंगलातलं सगळ्यात धोकादायक जनावर - **पिल्लं असणारी वाघीण**

2) वनरक्षक -

**Ans.** वनरक्षक - **टोंगे**

**A3)** स्वमत 3

'वन्यप्राणी' यांची शारीरिक रंगसंगती व जडणघडण ही निसर्गाशी एकरूप असते, हे प्राण्यांच्या फायद्याचे असते, हे विधान स्पष्ट करा.

**Ans.** वरील विधान बरोबर आहे. कारण प्रत्येकाने स्वत:चे संरक्षण स्वत: करावे ही अपेक्षा असते. वन्यप्राण्यांची भाषा माणसाला कळत नाही. म्हणून त्यांची 'शिकार' करू नये. यासाठी निसर्गाने संरक्षण कवच बहाल केलेले आहे. त्यामुळे प्रत्यंक वन्यप्राणी आपल्या जीवाचे रक्षण करू शकतो. त्यासाठी वन्यप्राण्यांची रचना, शारीरिक रंगसंगती व जडणघडण ही निसर्गाशी एकरूप असते.

**(आ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1 **A1)** i) आकृती पूर्ण करा 1




**Ans.**




ii) एका वाक्यात उत्तर लिहा 1

लेखकाला शाळेच्या चाचणी परीक्षा कोणत्या दिवशी असे ?

**Ans.** लेखकाच्या शाळेत चाचणी परीक्षा दर शनिवारी असे.

> आमच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. आमचं हायस्कूलही गरीब होतं, त्यामुळं उत्तरपत्रिका घरून न्यावी लागायची. त्यावेळी तिची किंमत फक्त तीन पैसे असायची. आपल्याला कदाचित पटणार नाही; पण तेव्हा दर आठवड्याला हे तीन पैसे उभे करताना देखील माझ्या आईच्या डोळ्यांत पाणी उभं राहायचं. आजही हे आठवलं, की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. तिने माझ्यासाठी प्रचंड कष्ट केले. पडेल ते काम केले. काँग्रेस हाऊस जवळ काही काम मिळणार आहे, असं समजल्यानं एकदा ती तिकडं गेली. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत; पण त्यावेळी तिला सांगण्यात

आलं, की फक्त तिसरी किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्यांनाच काम दिलं जाईल. हे ऐकून अर्थातच ती नाराज झाली, घराकडं मागं फिरली. त्याच वेळी तिनं ठरवलं, की 'मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही.'

तिनं प्रत्यक्षात केलंही तसंच. माझ्यासाठी तिनं घेतलेले कष्ट मी कोणत्या शब्दांतून सांगू? कोरे, पाठकोरे, लिहून उरलेले कागद ती एकत्र जमवायची आणि त्याच्या वह्या करून द्यायची. अखंड पेन्सिल मला मिळणं अवघड होतं. त्यामुळं जेमतेम हातात धरता येईल अशा पेन्सिलनेच लिहावं लागे.

**A2)** कारणे लिहा 2

1) लेखकाच्या आईला काँग्रेस हाऊसमध्ये काम मिळाले नाही कारण - ...............

**Ans.** लेखकाच्या आईला काँग्रेस हाऊसमध्ये काम मिळाले नाही कारण **लेखकाची आई तिसरी शिकली नव्हती**.

2) लेखकाला परीक्षेसाठी उत्तरपत्रिका घरून न्यावी लागे कारण

**Ans.** लेखकाला परीक्षेसाठी उत्तरपत्रिका घरून न्यावी लागे कारण **त्यांचे हायस्कूल गरीब होते.**

**A3)** स्वमत 3

डॉ. माशेलकर यांची मातृभक्ती ज्या प्रसंगातून ठळकपणे जाणवते ते प्रसंग लिहा.

**Ans.** या पाठात डॉ. माशेलकर यांनी आपल्या आईबद्दल प्रचंड श्रद्धा व आदर व्यक्त केला आहे. त्यांनी आईचा उल्लेख करताना परमप्रिय असा केला आहे. त्यांच्या बाबतीत तर आई ही माझी केवळ शिक्षक नव्हती तर त्यांचे सर्वस्व होती. त्यांची आई मुलाच्या शिक्षणासाठी दारिद्याशी संघर्ष करत होती. तिने ठाम निर्धार केला होता की मी माझ्या मुलाला खूप शिकवीन, कारण शिक्षणाशिवाय या जगात मान नाही. अशाप्रकारे शिक्षणाला महत्त्व देणारी व शिक्षणासाठी अथक परिश्रम करणारी होती.

**अपठित गदय**

**(इ) उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1 **A1)** चौकटी पूर्ण करा 2

1) वाचनामुळे यांना जोडण्याची प्रक्रिया वेगाने झाली → [ ] [ ]

**Ans.** वाचनामुळे यांना जोडण्याची प्रक्रिया वेगाने झाली

- माणसा - माणसाला
- समाजा - समाजाला

2) ज्ञानाचा देवाण घेवाणीमुळे हे झाले. → [ ] [ ]

**Ans.** ज्ञानाचा देवाण घेवाणीमुळे हे झाले.

- ज्ञानाचा प्रसार वाढला
- ज्ञानाचा वेगाने भर पडू लागला.

सकाळी घरात वर्तमानपत्र आले की, ते पहिल्यांदा वाचण्यासाठी आम्हा भावंडांची धडपड असते. प्रत्येकाला आपणच ते प्रथम वाचावे असे वाटते. जगाच्या कानाकोपऱ्यांत काय चालले आहे, हे जाणून घेण्याची केवढी ही उत्सुकता ! आपल्याला वाचता आले नसते, तर केवढया अगाध ज्ञानाला आपण पारखे झालो असतो ! 'वाचल, तर वाचाल' हे डॉ. आंबेडकरांचे सुवचन किती सार्थ आहे ! वाचनाने आपण बहुश्रुत होतो. वाचन ही जगाकडे पाहण्याची खिडकी आहे.

मुद्रणकलेच्या शोधापूर्वी माणूस लिहीत-वाचत होता; पण ही संधी फारच थोडया लोकांना उपलब्ध होती. मुद्रणाच्या शोधानंतर मात्र पूर्वीच्या तुलनेत खूपच लोकांना वाचनाची संधी उपलब्ध झाली. त्यामुळे माणसा-माणसाला, समाजा-समाजाला जोडण्याची प्रक्रिया वेगाने होऊ लागली. जग अधिक जवळ येऊ लागले. ज्ञानाची वेगाने देवाणघेवाण होऊ लागली; ज्ञानाचा प्रसार वाढला व त्यात तितक्याच वेगाने भर पडू लागली. अज्ञानाचे पर्वतच्या पर्वत कोसळू लागले. माणसाने एका नव्या युगात प्रवेश केला. हे नवे युग निर्माण झाले होते ते वाचनामुळे !

**A2)** एका वाक्यात उत्तर लिहा 2

1) आपणांस वाचता आले नसते तर काय झाले असते ?

**Ans.** आपणांस वाचता आले नसते तर आपण अगाध ज्ञानाला पारखे झालो असतो.

2) डॉ. आंबेडकरांचे सार्थ सुवचन कोणते ?

**Ans.** 'वाचाल तर वाचाल' हे डॉ. आंबेडकरांचे सार्थ सुवचन होय.

**विभाग २ - पदय**

**प्र.२ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

1 **A1)** आकृती पूर्ण करा. 2




**Ans.**




| |
|---|
| दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.<br>हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे<br>शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;<br>भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. |
| हे हात माझे सर्वस्व; दारिद्याकडे गहाणच राहिले<br>कधी मनात उंचावलेले, की कलम झालेले पाहिले<br>हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले<br>तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले. |
| दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो<br>दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो<br>झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले<br>दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले. |

**A2)** i) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा 1

दारिद्याकडे गहाण पडलेले हात

**Ans.** काम न आवडणारे असले आणि तरीही करावे लागले तर दारिद्याकडे गहाण ठेवलेले हात.

ii) उत्तरे लिहा. 1

कवितेतून व्यक्त झालेले भीषण सत्य कोणते?

**Ans.** दोन दिवस वाट बघण्यात गेले, दोन दिवस दु:खात गेले. हे भीषण सत्य कवितेतून व्यक्त झालेले आहे.

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

(i) पोलाद - (ii) धुंद -
(iii) साहाय्य - (iv) शेकणे -

**Ans.** (i) पोलाद - **लवचीक केलेले लोखंड**
(ii) धुंद - **नशा**
(iii) साहाय्य - **मदत**
(iv) शेकणे - **तापणे**

**A4)** स्वमत 2

कवितेत व्यक्त झालेल्या कष्टक-यांच्या जीवनाविषयी तुमच्या भावना लिहा.

**Ans.** 'दोन दिवस' या कवितेचे कवी नारायण सुर्वे यांनी जीवनाचे वास्तव मांडले आहे. कष्टक-यांच्या जीवनातील व्यथा मांडताना कवी म्हणतात, भविष्यामध्ये आपले आयुष्य चार दिवसांचे असते. त्यात दोन दिवस दु:ख झेलण्यात आणि दोन

दिवस सुखाची वाट बघण्यात गेले. खूप कष्ट केले. आयुष्य दारिद्र्याकडे गहाण पडले. कधी हातांनी अभिमानास्पद कामगिरी केली. पण बरेचदा हात जायबंदी केले गेले. कष्टक-यांचे जीवन अतिशय कठीण परिस्थितीतून जात असते. भाकरीचा चंद्र त्यांना मिळवावा लागतो. आकाशातला चंद्र रोज वेळेवर येतो. मात्र भाकरीच्या चंद्रासाठी संपूर्ण जीवन घालवावे लागते. त्यामुळे त्यांचे अश्रू हेच त्यांचे मित्र असतात.

**(आ) कवितेसंबंधी खालील मुद्द्यांना अनुसरून कृती सोडवा.** **(8)**

खालील मुद्द्यांच्या आधारे कवितेसंबंधी कृती सोडवा.

१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री

२) कवितेचा विषय

३) खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा.

(अ) फुलाफुलांचे दाट ताटवे, जिथे पोचते दृष्टी
रंग मजेचे, रंग उद्याचे, जपून ठेवू सृष्टी...

(ब) धान्य देईना संगणक ही, काळी आई जगवू
मातीमध्ये जे हात राबती, तयांस देऊ पुष्टी ...
रंग मजेचे, रंग उद्याचे

(क) उधळू, फेकू बिया डोंगरी, रुजतील देशी झाडे
गच्च माजतील राने, होईल आभाळातून वृष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

(ड) डोंगरातून वाहात येते, खळाळते हे पाणी
फेनधवलशा तुषारांमध्ये , राहाल कैसे कष्टी?
रंग मजेचे, रंग उदयाचे

(इ) मिळेल पैसा, मिळेल दौलत, यंत्रांच्या संगती
आभाळाच्या छत्रा खाली, एक अनोखी तुष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

(ई) हिरवी हिरवी मने भोवती, किती छटा हिरव्याच्या
गभरिशमी सळसळण्याच्या जगास सांगू गोष्टी...
रंग मजेचे, रंग उदयाचे

४) कवितेतून मिळणारा संदेश

५) कविता आवडण्याची व न आवडण्याची कारणे

**Ans.** १) प्रस्तुत कवितेची कवयित्री अंजली कुलकर्णी आहेत.

२) 'रंग मजेचे रंग उद्याचे' या कवितेतून कवयित्रीने संगणक युगातही निसर्गाची जोपासना करायला हवी हे सुंदर शब्दांत सांगितले आहे.

३) (अ) आपण उभं राहिल्यानंतर जिथपर्यंत आपली नजर पोचे तिथपर्यंत फुलांच्या भरपूर लांबच्या लांब बागा दिसतात. त्यांचे रंग आणि सूर्य उद्याचे रंग सर्व जपून ठेवू या.

(ब) संगणक (कॉम्प्युटर) आपल्याला धान्य देत नाही. धान्य मिळण्यासाठी काळी आई (माती) आपण जगवू या. जर मातीमध्ये हात काम करत असतील तर त्यांना प्रोत्साहन देऊ या.

(क) सगळीकडे बिया उधळल्या, फेकल्या तर या बिया मातीत रुजतील. पाऊस पडेल आणि सगळीकडे राने वाढतील. त्याच्या दाटीने हिरवा रंग पसरेल. या रंगांनी मजा येते. हा रंग उद्याचा आहे.

(ड) डोंगरातून पाणी वाहात येते. त्या वाहत्या पाण्याचा खळाळता आवाज, त्याचे तुषार हे फेसासारखे पांढरे असतात. या वातावरणातर तुम्ही दुःखी राहू शकतच नाही. या रंगाची हीच गंमत असते. उद्याचे रंग सुंदरच असतात.

(इ) यंत्राच्या संगतीने म्हणजे यंत्रावर काम करून आपल्याला पैसा, दौलत (संपत्ती) मिळेल आणि आभाळाच्या खाली म्हणजेच पर्यावरणाचे रक्षण केले तर आपल्याला समाधान मिळेल. पर्यावरणाचे रंग हे आपल्याला मजा, आनंद मिळवून देतात. उदय म्हणजे उत्कर्ष.

(ई) हिरवी मने म्हणजे तारूण्याचा उत्साह, उत्कर्ष, तरतरीतपणा. अशा हिरव्याच्या वेगवेगळ्या छटा आहेत. गभरिशमी यांचा जो सळसळणारा आवाज हा गवताची पाती एकमेकांना लागल्यानंतर जो ध्वनी ऐकायला येतो, तो ध्वनी रंगामुळे आवाजांना उपमा देता येते. अशी रंगाची मजा आहे. रंगामुळे उत्कर्षाचा अनुभव मिळतो.

४) 'रग मजेचे रंग उद्याचे' या कवितेमध्ये कवयित्री अंजली कुलकर्णी यांनी यंत्र युगातही पर्यावरण सुंदर ठेवावे त्यामुळे मानवी मने समृद्ध होतात हा संदेश दिला आहे. त्याचबरोबर मानवाने पर्यावरणाची काळजी घेतली पाहिजे, पर्यावरणाची जोपासना केली पाहिजे. निसर्गसौंदर्यांचा आस्वाद घेतला पाहिजे. निसर्गाशी एकरूप होऊन जगण्यातच खरा आनंद आहे. हा संदेश आम्हाला या कवितेतून मिळतो.

५) संगणकाच्या युगात निसर्ग प्रेमाचे महत्त्व सांगणारी ही कविता मला खूपच आवडली. प्रस्तुत कवितेत पर्यावरणाचे रक्षण करण्यास सांगितले आहे. यंत्रयुगात पर्यावरणाचा झपाट्याने नाश होत आहे. परिणामी पर्यावरणाची होणारी हानी थांबवून पर्यावरणाचे रक्षण आपण केले पाहिजे. तरच निसर्गाच्या विविध मनोहारी सौंदर्यात जगण्याचा मनस्वी आनंद आपणास मिळू शकेल. निसर्गाचा चमत्कार दाखवणारी ही कविता मला प्रसन्न करते. म्हणूनच मला ही कविता आवडते.

**किंवा**

खालील मुद्द्यांच्या आधारे संतवाणीसंबंधी कृती सोडवा. (कोणतेही पाच)

१) प्रस्तुत संतवाणीचे रचनाकार.
२) संतवाणीचा विषय.
३) खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा.
(अ) जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।
(ब) जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।
(क) उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।
(ड) उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्त्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ।।
(इ) मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।
अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
(ई) तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।
४) अभंगातून मिळणारा संदेश
५) संतवाणी आवडण्याची वा न आवडण्याची कारणे.
६) प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा.
(i) जेवी (ii) जीवन (iii) निववित (iv) सुखदाता
खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.
(i) सुखी (ii) गोड (iii) मृदू (iv) तृप्त
(i) ज्ञान (ii) विकृती (iii) जन्म (iv) मालक
खालील शब्दांचे लिंग बदला.
(i) पक्षी (ii) गाय
खालील शब्दांचे वचन बदला.
(i) पिल्लू (ii) वनी
खालील शब्दांचे वचन ओळखा.
(i) पिल्ले (ii) वने

**Ans.** १) संत एकनाथ हे प्रस्तुत संतवाणीचे रचनाकार आहेत.
२) 'योगी सर्वकाळ सुखदाता' या अभंगात 'योगी पुरूष व पाणी' यांची तुलना करून योगी पुराषाचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. तन्मयतेने भक्ती हा विषय हाताळला आहे.
३) खालील ओळींचा सरळ अर्थ लिहा.
(अ) चकोर चंद्रकिरणांची वाट बघतात. पिल्लांसाठी पक्षिणीचे पंख मायेची ऊब देतात. प्रत्येक जीवाला जीवन देणारे 'पाणी' असते. त्याचप्रमाणे सर्वांशी मृदू (नम्रतेने) वागावे.
(ब) पाणी वरवरचा मळ स्वच्छ करते; पण योगी अंतर्बाह्य स्वच्छ करतात. पाणी प्यायल्यानंतर एकदाच समाधान होते. म्हणजेच तहान लागली की परत परत पाणी प्यावे लागते; पण योगी जे मार्गदर्शन करतात त्यामुळे अनंत काळचे सुख मिळते.
(क) पाण्यामुळे क्षणभर सुख मिळते. योग्यांमुळे कायमस्वरूपी सुख मिळती.
(ड) पाण्याच्या गोडव्यामुळे जिभेला गोडवा मिळतो, परंतु योग्यांच्या सहवासाने सर्व इंद्रिये सुखावतात.
(इ) पावसाच्या पाण्यामुळे पीक तयार होते, त्यामुळे सर्वांना अन्नधान्य मिळते.
(ई) मानव म्हणून जन्माला आल्यानंतर योग्यांच्या सहवासात येणे आणि त्यांचे कीर्तन ऐकून स्वतःला योग्य दिशेला नेऊ शकतात.
४) या अभंगातून योगी पुरूषाचे महत्त्व सांगितले आहे. योगी पुरुष तपःसाधनेने आत्मज्ञान प्राप्त करतो आणि हे आत्मज्ञान श्रवण कीर्तनाच्या रूपाने जनमानसात वाटतो. योगी पुरूषाच्या आत्मज्ञानाने माणसांची मने निःस्वार्थी व निर्मळ होतात. योगी पुरूषांचा सहवास हा आपल्याला योग्य मार्गातून प्रगतीकडे घेऊन जातो. योगी पुरूषांच्या सहवासाने संसारातील दुःख दूर होते. आत्मिक बळ व मनःशांती मिळते, असा संदेश या अभंगातून मिळतो.
५) या अभंगात योगी पुरुष व पाणी यांची तुलना करून योग्य पुरूषाचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. पाण्याने एका वेळची तहान भागते, परंतु योगी पुरूष हा सर्वांसाठी सर्वकालीन सुख देणारा सज्जन आहे. ही बाब संत एकनाथांनी उदाहरण देऊन सोप्या शब्दात पटवून दिली आहे. योगी पुरूषाची महत्त्व मनाला भावते. योगी पुरूषाच्या सहवासाने मार्गदर्शन व मनःशांती मिळते. या अभंगाची रचना अतिशय सोपी व साधी असल्यामुळे अभंगाचा अर्थ सहजपणे समजतो.
६) प्रस्तुत कवितेतील शब्दांचे अर्थ लिहा.
(i) ज्याप्रमाणे (ii) पाणी (iii) संतुष्ट करणे (iv) सुख देणारा
खालील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा.
(i) दुखी (ii) कडू (iii) कठीण (iv) अतृप्त
(i) अज्ञान (ii) प्रकृती (iii) मरण (iv) दास
खालील शब्दांचे लिंग बदला.
(i) पक्षिणी (ii) बैल
खालील शब्दांचे वचन बदला.

Since-1989 BABU SIRS GROUP TUITIONS

(i) पिल्ले (ii) वने

खालील शब्दांचे वचन ओळखा.

(i) अनेकवचन (ii) अनेकवचन

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र.३ खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(6)**

**1)** कवितेतील सूर्य आणि पणती या प्रतीकांचा तुम्हांला समजलेला अर्थ सविस्तर लिहा.

**Ans.** कवितेतील सूर्य या प्रतीकांद्वारा कळते कितीही शक्तीशाली असलो तरी आपल्यालाही कोणाचे तरी सहाय्य हवे असते. तेजस्वी सूर्य सुध्दा अस्ताच्या वेळी शक्तीहीन होऊन पृथ्वीला वाचविण्यासाठी विनंती करीत असतो. त्याचवेळी पणतीच्या प्रतीकांद्वारे अगदी छोट्या जीवातही जगाला काहीतरी देण्याची जग सुंदर करण्याची क्षमता असते अंधारापासून जगाला कोणीही वाचविण्यास तयार नसते त्यावेळी छोटीशी पणती पुढे येते नम्रपणे पृथ्वीला तेजोमय करण्याचे वचन ती सूर्याला देते. अशाप्रकारे छोटया जीवांतही जगाला काहीतरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते हे सांगितले आहे.

**2)** ' पाणी हेच जीवन !' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

**Ans.** पाणी हे पृथ्वीवरील अमृत आहे. पाणी हे पृथ्वीवरील प्रत्येक घटकाला आवश्यक असते. पाण्याशिवाय आयुष्य जगणे शक्य नाही. सृष्टीला जीवंत ठेवण्याची सामर्थ्य फक्त पाण्यातच आहे. पाणी नसल्याने संपूर्ण धरती मरूभूमीचे रूप धारण करते म्हणून पाणी आवश्यक आहे.

**3)** ‘स्काय इज द लिमिट’ ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते ते पाठाच्या आधारे लिहा.

**Ans.** आपण जेव्हा स्वतः साठी स्वतःच काम निर्माण करू आपण काय काम करायचं हे आपण स्वतःच ठरवलं पाहिजे. बॉसने सांगितलं तेवढचं काम करायचं आणि सांगितलं नसेल तर आपल्याला कामच नाही असं समजायचं, हे चूक आहे. हे जेव्हा सगळ्यांच्या लक्षात येईल. तेव्हा सर्वासाठी ‘स्काय इजद लिमिट’ ही परिस्थिती निर्माण होईल.

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**प्र.४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

Since-1989 BABU SIRS GROUP TUITIONS

**(१) वाक्यांचे प्रकार ओळखा -** **(2)**

i. आई हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते.
ii. तो माझ्याशी बोलणार नाही का?

**Ans.** i. विधानार्थी वाक्य
ii. प्रश्नार्थी वाक्य

**(२) वाक्यरुपांतर -** **(2)**

**1)** रमा परीक्षेत उत्तीर्ण झाली आहे. (नकारार्थी वाक्य करा)

**Ans.** रमा परीक्षेत अनुत्तीर्ण झाली नाही.

**2)** तपोवनाकडे कोण कशाला जातोयं? (विधानार्थी करा.)

**Ans.** तपोवनाकडे कोणीच जात नाही.

**(३) खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (फक्त २)** **(4)**

**1)** सक्त ताकीद देणे →

**Ans.** सक्त ताकीद देणे → **कडक सूचना देणे**
**वाक्य**- पावसाळ्यात पाणी उकळून व गाळून प्या अशी <u>सक्त ताकीद</u> मी घरच्या मंडळींना दिली होती.

**2)** उत्तेजन मिळणे →

**Ans.** उत्तेजन मिळणे → **प्रोत्साहन मिळणे.**
**वाक्य**- खेळाच्या स्पर्धेत शिक्षकांकडून विद्यार्थांना <u>उत्तेजन मिळाले.</u>

Since-1989 BABU SIRS GROUP TUITIONS

**3)** नापसंती दर्शवणे →

**Ans.** नापसंती दर्शवणे → **नकार दर्शवणे**
**वाक्य** → न आवडणा-या गोष्टीबद्दल माणूस **नापसंती दर्शवतो.**

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती -**

**(i) लिंग बदला.** **(1)**

बालक - ...............
बेडूक - ...............

**Ans.** बालक - **बालिका**
बेडूक - **बेडकी**

**(ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(1)**

**1)** (i) अवघड (ii) खाजगी

**Ans.** (i) सोपे (ii) सार्वजनिक

**(iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(1)**

**1)** (i) नाटक लिहिणारा - ...............
(ii) कादंबरी लिहिणारा - ...............

**Ans.** (i) नाटक लिहिणारा - **नाटककार**
(ii) कादंबरी लिहिणारा - **कादंबरीकार**

**(iv) वचन बदला.** **(1)**

कुंडी - ...............
कसोटी - ...............

**Ans.** कुंडी - **कुंड्या**
कसोटी - **कसोट्या**

**(२) लेखननियमांनुसार लेखन -**

**लेखननियमांनुसार बदल करा.** **(2)**

**1)** अशी भावना ते माझ्यामधे नीर्माण करत.

**Ans.** अशी भावना ते **माझ्यामध्ये निर्माण** करत.

**2)** बीचारा अतिप्रामानिक!

**Ans.** बिचारा अतिप्रामाणिक!

**(३) विरामचिन्हे -** **(2)**

**1)** विरामचिन्हांचा योग्य वापर करा.
आपणही यांच्याप्रमाणेच खेळावे अशी इच्छा मनात येई.

**Ans.** आपणही यांच्याप्रमाणेच खेळावे, अशी इच्छा मनात येई.

**2)** विरामचिन्हांची नावे लिहा.
केवळ शास्त्र नाही, तर त्या विषयाची गोडी लावली.

**Ans. , - स्वल्पविराम / (.) - पूर्णविराम**

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र.५ (अ) 1. पत्रलेखन -** **(6)**

**खालील विषयावर पत्र लिहा.**

मातृसेवा पुस्तकालय
नेताजी सुभाषचंद्र मार्ग, लातूर
ता. लातूर

त्वरा करा !
त्वरा करा !

"वाचाल तर
वाचाल"

वेळ
सकाळी १० ते
सायं. ८ पर्यंत

दुकानाच्या वर्धापन दिनानिमित्त
आकर्षक सवलत

दिनांक
१ एप्रिल ते १५
एप्रिल २०२२ पर्यंत

विद्यार्थ्यांकरिता २०% सवलत
वाचकांकरिता १००० रुपये किंमतीची विशेष भेट

(अ) वाचक या नात्याने मा. व्यवस्थापक यांना स्वत:साठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

(ब) शालेय ग्रंथालय प्रतिनिधी या नात्याने व्यवस्थापकांना शालेय ग्रंथालयासाठी मागवलेल्या पुस्तकांवर अधिक सवलत मिळावी यासाठी विनंती करणारे पत्र लिहा.

Since-1989
BABU SIRS
GROUP TUITIONS

**Ans.**

**(अ) वाचक या नात्याने मा. व्यवस्थापक यांना स्वत:साठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.**

दिनांक: ५ एप्रिल, २०२२.
प्रति,
माननीय व्यवस्थापक,
मातृसेवा पुस्तकालय,
नेताजी सुभाषचंद्र मार्ग
ता. जि. लातूर
लातूर - ४५० ३०५.
**विषय -** पुस्तकांची मागणी करणारे पत्र.
माननीय महोदय,

मी अमेय चव्हाण, आपले निवेदन वाचून आपणास पत्र लिहित आहे. खाली दिलेल्या यादीतील तपशिलानुसार मला पुस्तकांच्या प्रतींची आवश्यकता आहे. कृपया आठ ते दहा दिवसांत खालील पत्त्यावर पुस्तके पाठवावीत ही विनंती. पुस्तकांबरोबर बिल पाठवावे. तसेच आपला खाते क्रमांक व बँकेचे नाव कळविल्यास, आपल्या खात्यावर बिलाची रक्कम पाठविण्यात येईल. माझा ई-मेल आयडी दिलेला आहे.

**पुस्तकांची यादी**
(१) श्रीमान योगी - १ प्रत
(२) पानिपत - १ प्रत
(३) मराठी व्युत्पत्ती कोश - १ प्रत

सहकार्याबद्दल धन्यवाद.
आपला विश्वासू,
अमेय सुर्वे
गणेश नगर,
लातूर - ३०० ०९५.
ई-मेल आयडी - surveameya5@gmail.com

**(ब) शालेय ग्रंथालय प्रतिनिधी या नात्याने व्यवस्थापकांना शालेय ग्रंथालयासाठी मागवलेल्या पुस्तकांवर अधिक सवलत मिळावी यासाठी विनंती करणारे पत्र लिहा.**

दिनांक: २ एप्रिल, २०२२.
माननीय व्यवस्थापक,
मातृसेवा पुस्तकालय,
नेताजी सुभाषचंद्र मार्ग,
ता. जि. लातूर - ३०० ०९५.

Since-1989
BABU SIRS
GROUP TUITIONS

**विषय - पुस्तकांवर अधिक सवलत मिळण्याबाबत.**

मी मोनिका राणे, शालेय ग्रंथालय प्रतिनिधी इ. ९ वी, स्वामी विवेकानंद शाळा, लातूर.

'मातृसेवा पुस्तकालय' दुकानाच्या वर्धापनादिनानिमित्त आपण सवलत जाहिर केली आहे. अतिशय सुंदर उपक्रम आहे.

आपल्या पुस्तकालयातून आमच्या शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तक मागवली आहेत. आपण विद्यार्थ्यांकरिता २०% सवलत दिली आहे. परंतु आमच्या स्वामी विवेकानंद शाळेच्या ग्रंथालयासाठी जी पुस्तक मागवली आहेत, त्यासाठी आपण २०% पेक्षा अधिक सवलत मिळावी यासाठी आपणांस विनंती करत आहे.

मला विश्वास आहे की, आपण आमची विनंती मान्य कराल.
कळावे.
आपली विश्वासू,

मोनिका राणे,
शालेय ग्रंथालय प्रतिनिधी,
स्वामी विवेकानंद शाळा,
लातूर - ३०० ०९५.
ई-मेल आयडी - monikarane@gmail.com

Since-1989
BABU SIRS
GROUP TUITIONS

**किंवा**

**2. सारांशलेखन -**

**विभाग १ - गदय प्रं.१(इ) उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृति करा.** **(10)**

**(१) जाहिरातलेखन (60 ते 80 शब्द)**

गिर्यारोहण मोहिमेची जाहिरात तयार करा.

*साद घालतो सह्याद्री !*

*तरुणांनो तुमच्यातील तरूणाईला आव्हान !!*



दरवर्षीप्रमाणे 'हिमांकन 'हायकर्स'
मंडळाने उन्हाळ्याच्या सुट्टीत
शाळेय विद्यार्थ्यांसाठी गिर्यारोहण
मोहीम आयोजित केली आहे.

अधिक माहितीसाठी
२० में, २०१५ पर्यंत संपर्क

**'हिमांकन हायकर्स'**

२, रामनंद, अहिंसा मार्ग, कल्याण (प.), मुंबई - ४०० ०५०
दूरध्वनी – (०२२) २६४८४९५२

1) गिर्यारोहण या सुटटयासाठी आयोजित केल्या आहेत → ☐

2) जाहिरातील आव्हान आहे → ☐

3) मोहिम आयोजित करण्यात आली आहे. → ☐

4) गिर्यारोणाचे नाव → ☐

5) साद घालतो → ☐

Since-1989
BABU SIRS
GROUP TUITIONS

**Ans.** .

**(२) कथालेखन (80 ते 100 शब्द)**

**पुढील शब्दांच्या आधारे कथा लिहा.**

एक मुलगा – पावसाळ्याचे दिवस – रेल्वे रुळ

**Ans.** .

**(३) बातमीलेखन (80 ते 100 शब्द)**

खालील समारंभाची बातमी तयार करा.
साने गुरूजी विद्यालय वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न झाला.

**Ans.**

आमच्या वार्ताहराकडून, दिनांक: १४ जानेवारी

माणसाच्या बौद्धिक, मानसिक व शारीरिक विकासासाठी खेळांची आवश्यकता असते, असे प्रतिपादन मा. श्री. रोहित बर्वे यांनी केले. साने गुरुजी विद्यालय, सोलापूर येथे १३ जानेवारी रोजी शाळेच्या भव्य पटांगणात सकाळी आठ वाजता मोठ्या उत्साहाने वार्षिक क्रीडा महोत्सव पार पडला.

साने गुरुजी विद्यालयाच्या या वार्षिक क्रीडा महोत्सवात विविध कवायतींचे प्रकार, मल्लखांब, लेझीम व क्रीडा साहित्यावर आधारित नृत्य प्रकार विद्यार्थ्यांनी सादर केले. विक्रीलाही लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत होता.

या क्रीडा महोत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या संचालिका माननीय सौ. अपर्णा भोसले व अध्यक्ष माननीय श्री. रोहित बर्वे उपस्थित होते. या प्रसंगी विविध क्रीडा स्पर्धांत विजयी स्पर्धकांस रोख रक्कम व स्मृती चषक देण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. जितेंद्र महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच अध्यक्षांनी पाहुण्यांचे आभार मानले. या प्रसंगी शाळेचे विद्यार्थी, माजी विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**(इ) लेखनकौशल्य** **(8)**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणत्याही एक कृती सोडवा. (शब्दमर्यादा 100 ते 120 शब्द)**

1) खालील मुद्द्यांच्या आधारे अभयारण्यातील सफरीचा तुम्ही घेतलेला अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.




**Ans.**

**अभयारण्यातील फेरफटका**

इयत्ता दहावीत सरांनी 'जंगल डायरी' पाठ शिकवला आणि विद्यार्थ्यांनी लगेच आपणही अभयारण्यातील प्राणी, पक्षी व निसर्ग पाहण्यासाठी जाऊया असा तगादा लावला. विद्यार्थ्यांचा उत्साह पाहून शहरा जवळ असलेल्या 'संजीव गांधी नॅशनल पार्क' येथे जाण्याचे ठरविले. अभयारण्यात फेरफटका मारण्याची मजा सर्व विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळणार यामुळे सर्वजण आनंदात होते. आम्ही सकाळीच ७.०० वाजता या पार्कजवळ पोहचलो तिकिटे काढली. एका रांगेत सर्व विद्यार्थी जाऊ लागले. आत जाताच मोठमोठी झाडे, भितीवरील प्राण्यांची चित्रे व पार्कचे नियम बघत व वाचत आमचा या अभयारण्यातील फेरफटका सुरू झाला शहराच्यामध्ये एवढे मोठे अभयारण्य पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले.

'मुलांनो हे पहा पक्षांचे थवे एकत्र कसे जात आहेत', मोराचा व कोकीळेचा आवाज घुमत आहे अशी सर्व माहिती शिक्षक आम्हाला देत होते. तितक्यात आम्हाला वाघ, बिबळा, सिंह पाहण्याकरिता नेणारी बस आमच्या समोर येऊन उभी रहिली. बसमध्ये चढण्यापूर्वी बसचालकाने अभयारण्यात फिरतानाचे काही नियम आम्हांला सांगितले. बस सुरू झाली, सर्व विद्यार्थी प्राणी पाहावयास चांगलेच अधीर झाले होते. बसमध्ये खिडकीला डोळे लावून बसलो होतो. तेवढ्यात एक विस्तीर्ण जलाशय दिसला. सगळीकडून पक्षी फडफडण्याचे आवाज आले. जसजशी बस पुढे जात होती. तसतसे जंगल फारच दाट झाले होते. विविध मोठ-मोठ्या झाडांना पाहून नवल वाटत होते. मध्येच एखादे हरीण किंवा ससा टुणटुण उड्या मारत जात होते.

बसचालकाने अचानक शांत बसण्याचा इशारा केला. आम्ही बसमध्ये असून सुद्धा श्वास रोखून आता समोर काय दिसेल याची कल्पना करीत होतो. एक रूबाबदार, मोठा वाघ ऐटीत रस्ता ओलाडत होता. आजुबाजूला न पाहता तो आपल्याच मस्तीत चालला होता सर्व विद्धार्थी आवक झाले. बस पुढे निघाली मध्ये-मध्ये झाडांवर माकडांची कवायत पाहण्याचा आनंद लुटत होतो. जंगलात पशुपक्षी स्वच्छंद पणे फिरत असतात. निरव शांतता व निसर्गसुख उपभोगत असतात. प्राणी-पक्ष्यांना पाहून आम्हाला एका गुफेत नेण्यात आले. तेथील शिल्पकला पाहून तर आपल्या संस्कृतीची व परंपरेची माहिती मिळाली.

संध्याकाळ होताच आम्ही पार्कमधून बाहेर आलो. दिवसभर केलेली मजा व मिळालेले अनुभव या विषयी गप्पा मारत शिक्षकांचे आभार मानून सर्व आपल्या घरी पुन्हा एकदा या ठिकाणी यायचे असा संकल्प करून निघून गेले.

Since-1989 BABU SIRS GROUP TUITIONS

Since-1989 BABU SIRS GROUP TUITIONS

**2)** दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.




**Ans.**

**नदीचे आत्मवृत्त**
**ऐका माझी वाणी**
**मग मिळेल तुम्हां**
**शुद्ध पाणी ।।**

''मी नदी बोलत आहे. मी उंच डोंगराच्या सुळक्यावरून उडी घेऊन तुमच्यापर्यंत वाहत येते. येताना वाटेत भेटणाऱ्या माझ्या अनेक सख्यांना मी बरोबर घेऊन येते. त्यामुळे माझ्या पात्रात पाण्याचा मोठा प्रवाह बनतो. निसर्गातील दगड, डोंगर, झाडे, झुडपे, वेली अशा अनेक गोष्टी माझी वाट अडवण्याचा प्रयत्न करतात. कधी माझ्यासोबत लपंडाव सुद्धा खेळतात. तरीही मी माझा रस्ता काढून पुढे वाहत राहते. मी पुढे वाहत असताना मला अनेक झरे, नाले, नद्या येऊन मिळवतात. पृथ्वीवरील संपूर्ण सृष्टीचे जीवन हे माझ्यावरच अवलंबून आहे.

जागोजागी माझे रूप बदलत राहते. वेगवेगळ्या प्रदेशातून मी वाहत पुढे चालले आहे. प्रत्येक ठिकाणी लोक मला निरनिराळ्या नावांनी ओळखतात. कधी भीमा, कधी चंद्रभागा, कधी कृष्ण, कधी कावेरी, कधी गंगा अशी माझी अनेक नावे आहेत. प्रत्येक गावात सणावाराला माझी श्रद्धेने पूजा केली जाते. मी माझ्या किनाऱ्यावरील सर्वांना कोणताही भेदभाव न करता पाणी देते. त्यांची तहान भागवते. हिरवी राने आणि शेती पिकवते. मोठे मोठे मळे माझ्या पाण्यावर जगतात. पशुपक्षी माझ्या सान्निध्यात राहून त्यांना सुख होते. माणसाचे तन-मन माझ्यामुळे शुद्ध होते. म्हणून मला पवित्र मानले जाते. लहान मुले, स्त्रीया माझ्या काठावर येऊन मजा करतात. गमतीदार किस्से सांगून मलाही आनंदीत करतात. स्त्रीया आपल्या जीवनातील सुखदु:खाच्या गोष्टी माझ्याकडे व्यक्त करतात. त्यांच्या सुखदु:खात मला सहभागी करून त्या मी सुद्धा त्यांच्यातील एक आहे याची जाणीव करून देतात.

जगाचा पोशिंदा म्हणून ओळखला जाणारा शेतकरी हा माझ्याच पाण्यावरच आपली शेती करतो. अन्न-धान्य पिकवतो. पण आजकाल मी अस्वच्छ होत आहे. ज्याना मी स्वच्छ करते ती माणसेच मला प्रदूषित करीत आहेत. शहरातील गटराचे पाणी माझ्या प्रवाहात सोडून मला घाण करतात. शिवाय अनेक प्रकारचे कारखाने आपले विषारी वायू सोडून मला विषारी बनवतात. याचा परिणाम तुम्हाला भोगावा लागतोच. पण माझ्या पाण्यात राहणाऱ्या जलचर प्राण्यांनाही याचा त्रास होतो. मला तर हे हाल सहन करावे लागतातच याचे मला वाईट वाटतेच, पण त्या बिचाऱ्या जलचर प्राण्यांनी तुमचे काय वाईट केले आहे? उलट माझ्यातील निर्माल्य, घाण खाऊन ते मला स्वच्छ ठेवतात.

मला दु:ख याचेच वाटते ज्यांना मी शुद्ध पाणी व धान्यासाठी पाणी देते त्यांनाच माझे महत्त्व वाटत नाही. काही तर मला देवी म्हणून पूजतात तीच माणसं जेव्हा मला दूषित करतात तेव्हा तर त्यांचा खूप राग येतो. असे वाटते, की रौद्ररूप धारण करावे आणि पूर आणावा आणि सारी घाण धुऊन टाकावे. पण तुम्ही मला 'आई' म्हणता म्हणून मी आईच्या मायेने सारे अपराध विसरते. मला दुर्गंधी व दूषित केल्यामुळे नाना तऱ्हेचे रोग पाण्यामुळे होत आहेत. हे तुमच्या कधी लक्षात येईल?

वाळू व रेती काढून माझ्या पात्रातून नेऊन मला कोरडे ठणठणीत करता आहेत. कशी होणार माझी व माझ्या सहवासातील झाडांची झोपासना? पण हे मनुष्याला केव्हा कळणार? आमच्यावरील अन्याय केव्हा थांबवणार? आज मनुष्याला सावध करणे गरजेचे झाले आहे म्हणून मी माझी कहाणी सांगून थोडेसे दु:ख कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. आताची नवीन पिढी कदाचित त्यातून काहीतरी मार्ग नक्कीच काढेल आणि आपण सगळेच प्रदूषणरहित सुखाचे जीवन जगू शकू. विज्ञानाचा उपयोग निसर्गाला नष्ट करण्यासाठी नव्हे, तर त्याची जोपासना होईल याकरिता करावा. तरच विज्ञान आणि निसर्ग यांचा समतोल साधता येईल. मग मला स्वच्छ ठेवण्याच्या काही योजना आता तरी सुरू करा. माझे आरोग्य राखाल तर तुमचे ही आरोग्य आपोआप राखले जाईल. नाहीतर पश्चात्ताप करण्याची वेळ येईल बघा विचार करून एकदा !!

**3)** पावसाळ्यातील एक दिवस -
मुद्दे -
जून महिना सुरू झाली की, पावसाची वाट पाहणे - पहिल्या सरींचे स्वागत - मग रोजचा पाऊस - एखादा खास दिवस - त्या दिवसातील कार्यक्रम - मनावरील परिणाम.